Literacy for a Billion

Movie: Suvashinichi hi satvapariksha
Year:

Song: Ratra pahili bolate
Lyricist: Jagdish Khebudkar

हं... आ... हं... आ...
रात्र पहिली बोलते
रात्र पहिली बोलते
दु:ख हृदयी झेलते
सोसले तू घाव त्याला
सोसले तू घाव त्याला
प्रीत फुंकर घालते
रात्र पहिली बोलते
हं... आ...

स्पर्श हा हळुवार होता
वेदना ही झोप घेई
टिपून घेता पापणी ही
आसवांचा लोप होई
सातजन्मी सोबती तू
सातजन्मी सोबती तू
संगती मी चालते
रात्र पहिली बोलते

तू असा निष्पाप भोळा
का कळेना भावना रे
का मुक्याने सांगते या
अंतरीच्या यातना रे
हुंदक्याची ही फुले
हुंदक्याची ही फुले
माळेत माझ्या माळते
रात्र पहिली बोलते

तू सुखी तर मी सुखी रे
स्वप्न माझे भाबडे
आज हा अंधार आहे
जाऊया तेजाकडे
घे विसावा साजणा
कानात ममता बोलते
कानात ममता बोलते
रात्र पहिली बोलते
दु:ख हृदयी झेलते
सोसले तू घाव त्याला
सोसले तू घाव त्याला
प्रीत फुंकर घालते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*